# महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळ, पुणे-११

## नियामक मंडळाची ४५ वी बैठक दिनांक २७ सप्टेंबर २००५

## ठराव

मा.ना.रामराजे नाईक-निंबाळकर, मंत्री जलसंपदा (कृखोपाम) व अध्यक्ष महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळ यांचे अध्यक्षतेखाली व मा. ना. अजित पवार, मंत्री, जसंपदा (कृखोपाम वगळून) यांचे उपस्थितीत नियामक मंडळाची ४५ वी बैठक दिनांक २७.०९.२००५ रोजी पाटबंधारे सभागृह, मंत्रालय, मुंबई येथे संपन्न झाली. सदर बैठकीत विषयवार चर्चा होऊन खालीलप्रमाणे ठराव पारित करण्यात आले.

**ठराव क्र. ४५/१**

**"ठराव करण्यांत येतो की, नियामक मंडळाच्या ४४ व्या बैठकीत पारित झालेले ठराव कायम करण्यात येत आहेत."**

**ठराव क्र. ४५/२**

**"महामंडळाची आर्थिक स्थिती हा विषय नियामक मंडळाचे अवलोकनार्थ सादर केला असल्याने याबाबत ठराव करण्यात आला नाही."**

**ठराव क्र. ४५/३**

**"ठराव करण्यात येतो की, महामंडळाकडे निधी स्त्रोत नसल्याने निधी अभावी रखडलेल्या अपूर्ण कामांची सुरक्षा अनामत रक्कम परत करण्याबाबत खालील अटी व शर्तीच्या आधिन राहून नियामक मंडळाची मान्यता देण्यात येत आहे.**

**१. स्वीकृत निविदेच्या २/३ रकमे इतके काम (भाववाढ वगळून) झालेले असावे.**

**२. कालवे कामाच्या बाबतीत बांधकामे (Structures) पूर्ण झालेली असावीत.**

**३. कंत्राटदाराने भरलेली मूळ अनामत रक्कम व देयकातून वसूल केलेली अनामत रक्कम यांच्या ९० टक्के इतकीच रक्कम परत करणेत येईल. सुरवातीस भरलेल्या मूळ रक्कमेबद्दल मात्र ठेकेदाराची काम पूर्ण करण्याची सक्षमता व उर्वरित कामाचे परिमाण इत्यादी बाबी तपासूनच प्रकरणनिहाय निर्णय घ्यावा.**

**४. अनामत रक्कम परत मिळाल्यावरही कंत्राटदाराने उर्वरित काम पूर्ण करणे बंधनकारक आहे.**

**५. परत करण्यात येणाऱ्या सुरक्षा अनामत रकमेएवढी बँक गॅरंटी कंत्राटदाराकडून घेण्यात यावी.**

**६. उपरोक्त बँक गॅरंटीची वैधता प्रथमतः १ वर्षाची राहील व तदनंतर वेळोवेळी आवश्यतेनुसार Defect Liability कालावधीपर्यंत वाढवून घ्यावी.**

**७. वरील अ.क्र. ४ ते ६ या शर्तीच्या अनुपालनासाठी कंत्राटदाराकडून रु. १००/- च्या स्टॅम्प पेपरवर हमीपत्र घ्यावे."**

सही/-
मा.मंत्री, जलसंपदा (कृ.खो.पा.म.)
व अध्यक्ष, म.कृ.खो.वि.म, पुणे



सही/-
कार्यकारी संचालक
म.कृ.खो.वि.म. पुणे

ठराव क्र. ४५/४

"ठराव करण्यांत येतो की,

(अ) कृष्णा खोऱ्यातील उर्वरित कामे पूर्ण करण्याच्या दृष्टीने, ज्या कामांमुळे पाणीसाठा निर्माण होईल किंवा सिंचनक्षमता वाढेल किंवा तांत्रिकदृष्ट्या आवश्यक आहेत अशा कामांच्या अटी वित्त विभागाशी सल्लामसलतीने अंतिम करुन घेण्यात याव्यात.

या प्रस्तावातील कामे नव्याने निविदा निर्धारित करण्याचे अधिकार मा. अध्यक्षांचे संमतीने खालील अटींच्या अधीन राहून कार्यकारी संचालक यांना देण्यात येत आहेत.

१. सदर कामासाठी भूसंपादन आवश्यक असल्यास त्याचा प्रारंभिक खर्च तात्पुरत्या स्वरुपात कंत्राटदाराने, भूसंपादन अधिकाऱ्याच्या सल्ल्याने २/३ रकमेपर्यंत करावा.

२. ज्या ठिकाणी निविदेवर कामे सुरु होती व ती संस्थगित करण्यात आलेली आहेत अशी कामे आहे त्याच निविदेवर व त्या निविदेतील तरतुदीनुसार स्वबळावर पूर्ण करण्यास कंत्राटदाराची संमती असावी. नवीन कामांबद्दलही हीच भूमिका राहील व स्वबळावर कंत्राटदाराने केलेल्या कामाचे भुगतान महामंडळ लगेचच करु शकणार नाही याची स्पष्ट कल्पना कंत्राटदारास देऊन, याबाबत कंत्राटदार व महामंडळ यांच्यात हमीपत्र तयार करण्यात यावे व सदर हमीपत्र नोटरी कडून प्रमाणित करण्यात यावे. कंत्राटदारास स्वबळावर केलेल्या कामाचे भुगतान २-३ वर्षाच्या कालावधीमध्ये करता न आल्यास, त्याच्या विलंबाबद्दल त्यास कोणताही क्लेम देय असणार नाही. तसेच त्या केलेल्या कामाचे भुगतान न झाल्यबद्दल कोर्टा मध्ये जाऊ शकणार नाही अशा प्रकारची अट हमीपत्रात नमूद असावी.

या ठरावास नियामक मंडळाची मान्यता देण्यात येत आहे."

"ठराव करण्यात येतो की,

(ब) टेंभू उपसा सिंचन योजना टप्पा ३ (ब) ते खानापूर-तासगांव कावा कि.मी. ११ ते २० मधील कामे मे. प्रथमेश कंन्स्ट्रक्शन, मिरज यांचे मूळ निविदा क्र. ब-१/२ सन २००४-०५ या निविदेस स्वबळावर जोडून देण्यास मा. अध्यक्ष, मकृखोविम यांचे संमतीने मान्यता देण्यात आली आहे. या कार्यवाहीस नियामक मंडळाची कार्योत्तर मान्यता देण्यात येत आहे."

ठराव क्र. ४५/५

"ठराव करण्यात येतो की, खडकवासला प्रकल्पाच्या नवीन मुठा उजवा कालवा किमी. ३१ च्या कामास निधी उपलब्ध आहे व हे काम तांत्रिकदृष्ट्या अत्यावश्यक आहे, तथापी सदरहू काम नियामक मंडळाचा ठराव क्र. ३७/४ (ए.आय.बी.पी.) व ठराव क्र. ३९/२ (अ)(टंचाई) कामामध्ये येत नाही. निधी स्त्रोत असल्याने या कामाची निकड, बचत, सलगता व ठेकेदाराची गुणवत्ता इ.

| | | |
|---|---|---|
| सही/- | २ | सही/- |
| मा.मंत्री, जलसंपदा (कृ.खो.पा.म.) | | कार्यकारी संचालक |
| व अध्यक्ष, म.कृ.खो.वि.म, पुणे | | म.कृ.खो.वि.म. पुणे |

बाबी तपासून मा. अध्यक्षांच्या मान्यतेने सदरहू काम चालू निविदेअंतर्गत जोडून देण्यात आलेले आहे. या केलेल्या कार्यवाहीस नियामक मंडळाची कार्योत्तर मान्यता देण्यात येत आहे. "

ठराव क्र. ४५/६

"ठराव करण्यांत येतो की, महामंडळाचे ताब्यातील इंदापूर येथील सर्व्हे नंबर ५४७ मधील दोन एकर जागा महामंडळास सदर जागेची किंमत चालू बाजारभावाप्रमाणे मिळण्याच्या अटीवर कै.अनंतराव पवार ग्रामविकास प्रतिष्ठान निर-निमगांव तालुका इंदापूर यांना कायमस्वरुपी देणेसाठी जिल्हाधिकारी, पुणे यांचेकडे वर्ग करण्यास नियामक मंडळाची मान्यता देण्यांत येत आहे."

ठराव क्र. ४५/७

"ठराव करण्यांत येतो की, हडपसर येथील स.नं. २२४ (हिस्सा क्र. २) मधील पाटबंधारे विभागाची जागा महामंडळास लागणार असल्याने अक्षरसृष्टी ग्रंथालयास ही जागा देणेचा प्रस्ताव नामंजूर करण्यात येत आहे."

ठराव क्र. ४५/८

"ठराव करण्यांत येतो की,

१. मौजे कोपरे, ता. हवेली, जि. पुणे येथील जमीन श्री. रा. भा. पाटील यांना खंडाने देण्याचा मुदतवाढीचा प्रस्ताव नामंजूर करण्यात येत आहे.

२. सदर जमिनीचा उपयोग महामंडळाने सुशोभीकरण, वनीकरण इ. कारणासाठी करण्यास नियामक मंडळाची मान्यता देण्यात येत आहे"

ठराव क्र. ४५/९

"ठराव करण्यांत येतो की, जुना मुठा उजवा कालवा किमी. २३ हडपसर येथील संपादित स.नं. ११५/१, ११५/२, १४८ व १४९ मधील ३०२० चौ.मी. जागा महामंडळास सदर जागेची किंमत चालू बाजार भावाप्रमाणे मिळण्याच्या अटीवर मगरपट्टा सिटी हडपसर या संस्थेस शैक्षणिक कारणास्तव देण्यासाठी जिल्हाधिकारी, पुणे यांचेकडे हस्तांतरण करण्यास नियामक मंडळाची मान्यता देण्यात येत आहे. "

सही/-
मा.मंत्री, जलसंपदा (कृ.खो.पा.म.)
व अध्यक्ष, म.कृ.खो.वि.म, पुणे



सही/-
कार्यकारी संचालक
म.कृ.खो.वि.म. पुणे